# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कुलच्या बाजूला कनाकिया, मिरारोड (पु.)

दिनांक - १८/६/२०१९

जा.क्र. मनपा/नर/९३३४ / २०१९-२०

संबंधीत विकासकाने व सल्लागार अभियंता यांनी दि.25/00/2018 रोजीच्या संयुक्त शपथपत्रामध्ये सर्व कागदपत्रांची जागेबाबत. संबंधीत विकासकाने व सल्लागार अभियंता यांनी ... राहील असे शपथपत्र बांधकाम छाननी केलेली असून मालकी हक्काचे काही वाद उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील असे शपथपत्र बांधकाम प्रस्तावासोबत दिलेले आहे. तरीही प्रकरणात मालकीहक्काबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. याबाबत या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/नर/1264/2019-20, दि.13/06/2019 अन्वये 24 तासाच्या आत खुलासा करणेस विकासक व सल्लागार अभियंता यांना दि.13/06/2019 रोजीच्या पत्रान्वये नोटीस बजावली आहे. सदर नोटीसीबाबत संबंधीतांनी विहीत मुदतीत खुलासा सादर केलेला नाही.

सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधीत सर्व तक्रारदार, विकासक, सल्लागार अभियंता दी इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि., मंडळ अधिकारी व नगररचना विभागाचे अधिकारी व अभियंता यांची संयुक्त सुनावणी ही दि.17/06/2019 रोजी सकाळी 10.30 ते सायं. 4.00 पर्यंत प्रत्येक तक्रारीनिहाय स्वतंत्ररित्या आयोजित करुन तसे दि.13/06/2019 अन्वये उपस्थित राहणेबाबत संबंधीतांना कळविणेत आले होते. त्यानुसार विकासक, सल्लागार अभियंता, दी इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि. मंडळ अधिकारी, नगररचना विभागाचे अधिकारी व अभियंता यांचे उपस्थितीत प्रत्येक तक्रारदाराला स्वतंत्ररित्या सुनावणी देवून त्यांचे म्हणणे मांडणेची दि.17/06/2019 रोजी संधी दिली.

दि.17/06/2019 रोजीच्या माझे दालनात संबंधीत सर्व तक्रारदार यांच्या सोबत विकासक व सल्लागार अभियंता यांचेसह झालेल्या अर्जनिहाय सुनावणीमध्ये तक्रारदारांचे व विकासकाचे म्हणणे ऐकून घेतले असता, तक्रारदारांनी घेतलेल्या हरकतीबाबत विकासक व सल्लागार अभियंता हे प्रत्यक्ष सुनावणीत समाधानकारक खुलासा करु शकले नाहीत. सुनावणीअंती असे निदर्शनास आले की, काही प्रकरणात जागामालकाने विकासकास दिलेले हक्क काढून घेतलेले (Withdraw) आहेत, काही प्रकरणात मालकीहक्काचे दस्तऐवज नोंदणीकृत केल्याचे आढळून येत नाहीत, काही प्रकरणात इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनीच्या मालकीच्या जमिनीतील कुळांचे विकासकाने Settlement केलेले नाही, काही प्रकरणात जमिनीबाबत विविध मा. न्यायालयात वाद सुरु असून सदरची प्रकरणे ही न्यायप्रविष्ठ आहेत. हरकतधारकांनी घेतलेल्या हरकती ह्या रास्त असल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास येते. सबब त्यांनी हरकती घेतलेल्या जमिनी ह्या महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/7514/2018-19, दि.30/03/2019 अन्वये मंजूर केलेल्या सुधारीत रेखांकनासह सुधारीत बांधकाम परवानगीच्या प्रस्तावातून वगळण्याच्या निष्कर्षापर्यंत मी पोहोचलो आहे. अशा रितीने महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/7514/2018-19, दि.30/03/2019 अन्वये निर्गमीत केलेल्या सुधारीत बांधकाम परवानगी पत्रातील अट क्र. 23, 39 व 40 चे उल्लंघन झालेले आहे.

उपरोक्त सर्व बाबी व वस्तुस्थिती विचारात घेता याव्दारे प्रकरणात मी खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

(अ) विकासक मे. रवी डेव्हलपर्मेंट्स व इतर तसेच सल्लागार अभियंता मे. अनिष ॲन्ड असो. यांस महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/7514/2018-19, दि.30/03/2019 अन्वये दिलेली नकाशे मंजूरी व बांधकाम परवानगी रद्द करणेत येत आहे.

(ब) दि.30/03/2019 रोजीच्या बांधकाम परवानगीमधील अट क्र. 42 मधील रद्द करणेत आलेल्या परवानग्या ह्या पुनर्जिवीत करणेत येत आहेत.

(क) संबंधीत विकासक यांनी त्यांच्या स्वतःच्या निर्विवाद मालकीहक्क असलेल्या जमिनींमध्ये गावंनिहाय संलग्न असलेल्या जमिनीनिहाय सुधारीत रेखांकन व बांधकाम परवानगीचा फेरप्रस्ताव हा मालकीहक्काची परिपुर्ण अद्यावत कागदपत्रे, प्रस्तावित मोजणी नकाशा, इ. सर्व अद्यावत कागदपत्रांसह सादर करावा.

(बालाजी खतगांवकर) 17/6/19

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर

प्रति,

1) मे. रवी डेव्हलपमेंट्स व इतर (विकासक)
लक्ष्मी प्लाझा, 76, मथुरादास रोड, कांदिवली (पु.), मुंबई

2) मे. अनिष ॲन्ड असो. (सल्लागार अभियंता)
शॉप नं. 1,2, भैरव सृष्टी, तळ मजला, भाईंदर (प.)

3) संदर्भित सर्व तक्रारधारक / हरकतधारक

प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव :-

1. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका
2. विभाग प्रमुख, अतिक्रमण तथा अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग
3. प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र. 4,6
2/- यांना आदेशित करणेत येते की, उक्त जमिनीत वाढीव बांधकाम होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

Scanned with CamScanner

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगररचना विभाग
स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कुलच्या बाजूला कनाकिया, मिरारोड (पू.)

जा.क्र. मनपा/नर/ १३३५ / २०१९-२०  दिनांक - १५/६/२०१९

## // आदेश //

विषय - <u>मौजे घोडबंदर / नवघर येथील प्रस्तावामध्ये नमुद जमिनींमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेने जा.क्र. मनपा/नर/7514/2018-19, दि.30/03/2019 अन्वये मे. रवी डेव्हलपमेंट्स व इतर यांना दिलेली सुधारीत रेखांकनासह सुधारीत बांधकाम परवानगी बाबत.</u>

संदर्भ - 1) श्री. चंद्रकांत सि. वैती, उपमहापौर व इतर 5 यांचा दि. दि.30/05/2019 रोजीचा अर्ज.
2) श्री. मनोज मोटाजी पुरोहित व श्री. श्यामसुंदर राधेश्याम अगरवाल यांचा दि.28/05/2019 रोजीचा अर्ज.
3) श्री. हेमप्रकाश हिराजी पाटील, श्री. इमामुद्दीन निहालउद्दीन शेख, श्री. जगदीश नारायण गोयल, श्री. तुफाल रियाज राही यांचा दि.30/05/2019 रोजीचा अर्ज.
4) श्री. रामब्रिज बल्ली यादव / श्री. प्रतिक बल्ली यादव व इतर यांचा दि.04/06/2018 रोजीचा अर्ज.
5) श्री. मंगलदास गणेशदास पटेल, श्री. मेघजी पुरूषोत्तम भानुशाली व इतर यांचा दि. 04/06/2019 रोजीचा अर्ज.
6) श्री. परशुराम मुकूंद वैती व इतर 8 यांचा दि.21/05/2019 रोजीचा अर्ज.
7) श्री. रविंद्र एकनाथ पाटील, श्री. सदाशिव रामचंद्र पाटील यांचा दि. 04/06/2019 रोजीचा अर्ज
8) श्री. दिनेश श्रीनाथ घरत व इतर यांचा दि.12/06/2019 रोजीचा अर्ज
9) श्री. महेश रतनलाल अगरवाल व श्री. पंचदेव रादुलार पटेल यांचे दि.12/06/2019 रोजीचे पत्र.
10) श्री. जतिन लोकमान्य पाटील यांचेकडील दि.10/06/2019 रोजीचा अर्ज.
11) श्री. लियाकत गफुर शेख यांचेकडील दि.12/05/2019 रोजीचा अर्ज.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मौजे घोडबंदर स.क्र. 81/1,2,3पै.,5,6; 2) स.क्र. 27/8,9, 3) स.क्र. 27/1, 10अ, 2, व स.क्र. 28/5, 29/3 4) स.क्र. 83/1,2; 85/1/1अ, 5) स.क्र. 86/1,3,4,8अ,8ब,8क व स.क्र. 87/1अपै., 1ब,1क,1ड,2 व स.क्र. 88/1/1, 1/3, स.क्र. 89/1,3, स.क्र. 105/1,2, स.क्र. 225पै. 6) स.क्र. 72/2, 73/1,2,3,4, 74/1,2, 75/1, 79/1,3,4, 7) स.क्र. 82 यासह मंजूर एकत्रित रेखांकनात नव्याने समाविष्ट स.क्र. 26/1; 27/3,5,6,7, 28/1,2पै.,3पै.,29/1; 30/7पै.8पै.; 41/4अ.; 43/2,4,5,6; 55/2; 56/8; 63/1,2,3, 4,6ब,7,8,9; 64/1,2,3,4; 67/1,2; 68/1,2,3; 70/1,2; 81/4ब; 224/पै.; 225/पै.; 232/1अ,1ब,1क,2अ,2ब; 234/1 व मौजे नवघर मधील स.क्र./ हि.क्र. 1) स.क्र. 92पै.,93, 94, 95पै, (जुना स.क्र. 430 पै., 431, 432, 433पै.), 2) स.क्र. 128 (जुना 444/5), 3) स.क्र. 127 (जुना 443)/1पै., 1पै., 4) स.क्र. 106 (जुना 419), 116(420)/1,2,3; 117(जुना 421)/1,2,3अ,3ब,4,5,6, 103(जुना 422)/1,3पै.,4,5,6,7,8, 9,10,11, 105(जुना 423)/2,3,4,5पै., 5पै., 5पै., 5) स.क्र. 96(जुना 429)/2, 6) 96(जुना 429)/5, 7) 435पै., 436/2, 437/1 ते 11, स.क्र.438/1 ते 3,6, 439/1 ते 6,8; 440/1,3 ते 8,11,12,13; 8) 127(जुना 443)/2पै., 128(जुना 444)/1,3, 126(जुना 418)/2,3,4, 124(जुना 417)/7, 9) स.क्र. 447 (जुना 142)/4, यासह एकत्रित मंजूर रेखांकनात नव्याने समाविष्ट स.क्र. 105 (जुना 423)/1, 98(जुना 428)/3, 96(जुना 429)/1,3; 95(जुना 430)/1, 107 (जुना 436)/3, 115(जुना 442)/1 ते 5ब, 130(जुना 446)/1पै.,2, 142(जुना 444)/4, 447/3,5 या एकत्रित जागेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/7514/18-19, दि.30/03/2019 अन्वये मे. रवी डेव्हलपमेंट्स व इतर यांना सुधारीत रेखांकनासह सुधारीत बांधकाम परवानगी अटीशर्तीच्या अधिन राहुन देण्यात आलेली आहे.

सदर मंजूर रेखांकन व सुधारीत बांधकाम परवानगी अनुषंगाने मौजे घोडबंदर, स.क्र.55/2, 81/4बी, 29/1, 67/1,2, 68/1,70/1,74/2,41/1अ,26/1 व 28/3 तसेच मौजे नवघर, स.क्र. 423/1, 428/3 व 429/1,3 या जागेच्या मालकी हक्काबाबत तक्रारींचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. (1) श्री. चंद्रकांत वैती व इतर 5 यांनी मौजे घोडबंदर, स.क्र. 67/1 या जागेबाबत (2) श्री. मनोज पुरोहित व इतर 3 यांनी मौजे घोडबंदर, स.क्र. 68/1 व 70/1 या जागेबाबत, (3) श्री. हेमप्रकाश हिराजी पाटील व इतर यांनी मौजे नवघर, स.क्र. 423/1, 428/3 या जागेबाबत. (4) श्री. रामब्रिज बल्ली यादव यांनी मौजे घोडबंदर, स.क्र. 55/2 या जागेबाबत, (5) श्री. लियाकत गफुर शेख यांनी मौजे घोडबंदर, स.क्र. 81/4ब या जागेबाबत, (6) श्री. मेघजी पुरुषोत्तम भानुशाली व इतर यांनी मौजे घोडबंदर, स.क्र. 28/3, 29/1 या जागेबाबत, (7) श्री. परशुराम मुकुंद वैती व इतर यांनी मौजे घोडबंदर, स.क्र. 232/1ब या जागेबाबत, (8) श्री. दिनेश श्रीनाथ घरत यांनी मौजे घोडबंदर, स.क्र. 41/4अ या जागेबाबत (9) श्री. महेश रतनलाल अगरवाल यांनी मौजे नवघर, स.क्र. 429/1,3 या जागेबाबत, (10) श्री. जतीन लोकमान्य पाटील यांनी मौजे घोडबंदर स.क्र. 72/2 या जागेबाबत, (11) श्री. लियाकत गफुर शेख यांनी मौजे घोडबंदर, स.क्र. 63/1,8,9 या

Scanned with CamScanner